**MHAH070005302018**

## <u>मोटार अपघात दावा अर्ज क्र.७६/२०१८</u>

## <u>निशाणी क्र.५३ वरील आदेश</u>

अर्जातील मजकुर पाहिला. गैरअर्जदार यांनी निशाणी क्र.५४ व ५५ चे म्हणणे दाखल करुन अर्जाचा प्रखर विरोध केलेला आहे. अर्जदार व गैरअर्जदार तर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत मुळ अर्ज अपघातामध्ये झालेल्या जखमांबाबत नुकसान भरपाई मिळावी म्हणुन दाखल करण्यात आलेला आहे. निशाणी क्र.४४ सोबत अर्जदारा तर्फे जवळपास पंचाहत्तर बीले दाखल करण्यात आलेली आहेत. ती हॉस्पीटलमध्ये अदा करण्यात आलेल्या रक्कमांची व मेडीकल स्टोअर्समध्ये अदा केलेल्या रक्कमांची आहेत. निशाणी क्र.४४ सोबत सदर बीले दाखल करतांनाच या न्यायालयाने केलेल्या आदेशाहुन असे दिसते की, बीले दाखल करण्यास परवानगी देण्यात आलेली होती, मात्र त्या संदर्भात पुरावा दिल्या नंतरच सदर बीलांना निशाणी देण्यात येईल असा आदेश केलेला आहे. अर्जदाराने मा. सर्वोच्च न्यायालयाचे **रेखा जैन विरुध्द नॅशनल इन्शुरन्स कं. लि., २०१३ ए.सी.जे. २१६१** या निर्णयाचा संदर्भ दिलेला आहे. त्या प्रकरणी अर्जदाराने बीलांबाबत स्वत:चा तोंडी पुरावा दिला होता, काही बीलांना निशाणी देण्यात आलेली होती व काही बीलांना विमा कंपनी तर्फे विचारात न घेता येण्या जोगी हरकत घेण्यात आली होती. त्यामुळे सदर बीले पुराव्यामध्ये विचारात घेण्यात आली. या प्रकरणी अद्याप अर्जदारां तर्फे पुरावा चालु आहे. दाखल करण्यात आलेल्या बीलां पैकी जास्तीत जास्त बीले संगमनेर येथीलच असुन काही बीले नाशिकची असल्याचे दिसते. वर नमुद केल्या प्रमाणे अर्जदाराने सदर बीले सिध्द करण्यासाठी आवश्यक तो पुरावा देणे गरजेचे आहे. आज मितीस तसा पुरावा न देता बीलांना निशाणी देण्या जोगी परीस्थीती आढळत नाही. त्यामुळे

अर्जात तथ्य वाटत नाही. अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. सबब खालील आदेश करण्यात येत आहे -

**आ दे श**

अर्ज निशाणी क्र.५३ नामंजुर करण्यात येत आहे.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH

Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2025.03.28 13:57:47 +0530

दिनांक – २८/०३/२०२५.

**( एम. एम. शेख )**
सदस्य
मोटार वाहन प्राधिकरण,
संगमनेर.